# यवतमाळ सत्ता

* मंगळवार २५ ऑगस्ट २०२६ * अंक नं. १०५ * किंमत ३ रुपये * पाने ४ * वर्ष ३ रे RNI No.MAHMR/26/A3138


## क्राईम...

### वृद्धावर लोखंडी गजाने हल्ला

यवतमाळ : येथील एका ज्येष्ठ नागरिकावर दारूच्या नशेत विनाकारण वाद घालून लोखंडी गजाने प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली. या हल्ल्यात वृद्ध गंभीर जखमी झाले असून यवतमाळ ग्रामीण पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, चंद्रभान बाबाराव दांडेकर (वय ६५, रा. सावर, ता. जि. यवतमाळ) हे २२ ऑगस्ट रोजी रात्री पावणेदहाच्या सुमारास आपल्या घरासमोर इतर लोकांसोबत बसले होते. याच वेळी गावातीलच आरोपी सागर धनराज रामगडे (वय २३) हा दारूच्या नशेत तिथे आला. त्याने चंद्रभान दांडेकर यांच्याशी विनाकारण वाद घालत अश्लील शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. वाद वाढल्याने आरोपीने हातातील लोखंडी गजाने दांडेकर यांच्या डाव्या डोळ्याच्या वर जोराने प्रहार करून त्यांना जखमी केले तसेच जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी फिर्यादी चंद्रभान दांडेकर यांच्या तक्रारीवरून यवतमाळ ग्रामीण पोलिसांनी आरोपी सागर रामगडेविरुद्ध भा.न्या.सं. कलम ११८(१), ३५२, ३५१(२)(३) अन्वये गुन्हा नोंदवला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

### महिलेचा विनयभंग; इसमावर गुन्हा दाखल

नेरपरसोपंत : तालुक्यातील एका गावातील १९ वर्षीय महिलेचा हात पकडून तिच्याशी गैरवर्तन केल्याप्रकरणी सुनील गजानन गजभिये याच्याविरुद्ध नेर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीवरून ही कारवाई केली. १९ ऑगस्ट रोजी दुपारी महिला घरासमोरील अंगणात असताना सुनील गजभिये तेथे आला. त्याने महिलेचा उजवा हात पकडून गैरवर्तन केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकारामुळे घाबरलेल्या महिलेने घरात जाऊन कुटुंबीयांना घटनेची माहिती दिली. यानंतर कुटुंबीयांनी संशयिताच्या घरी जाऊन घटनेबाबत विचारणा केली असता, त्याने पुन्हा असे कृत्य करणार नसल्याचे सांगितल्याचे तक्रारीत नमूद आहे. मात्र, या घटनेमुळे भीतीचे वातावरण निर्माण झाल्याने महिलेने पोलिसांत धाव घेत तक्रार दाखल केली. तक्रारीवरून नेर पोलिसांनी सुनील गजभिये याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# वनपालाचा आत्महत्येनंतर मृतदेह थेट जिल्हाधिकारी कार्यालयात !

**▪ सामाजिक वनीकरण विभागाच्या छळाला कंटाळून विष प्राशन; उपचारादरम्यान मृत्यू ;सुसाइड नोटमध्ये वरिष्ठांवर गंभीर आरोप; दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईच्या मागणीसाठी संतप्त नातेवाईकांचा ठिय्या**

*यवतमाळ सत्ता, प्रतिनिधी


**यवतमाळ** : शासकीय सेवेतील तब्बल तीन दशके ज्या व्यवस्थेसाठी खर्ची घातली, त्याच निबर आणि असंवेदनशील प्रशासकीय व्यवस्थेने अखेर एका वनपालाचा बळी घेतला. सामाजिक वनीकरण विभागाकडून ३० वर्षे अविरत सेवा दिल्यानंतरही हक्काच्या वेतनापासून वंचित ठेवल्याने, तसेच न्यायालयातील लढा जिंकूनही वरिष्ठांकडून सातत्याने होणाऱ्या मानसिक छळाला कंटाळून वनपाल रमाकांत शुक्ला यांनी विष प्राशन करून आत्महत्या केली.

आज उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाल्यानंतर संतप्त नातेवाईकांनी थेट शुक्ला यांचा मृतदेह जिल्हाधिकारी कार्यालयात आणून ठेवल्याने प्रशासकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे. दोषी अधिकाऱ्यांवर तत्काळ गुन्हे दाखल होत नाहीत तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही, असा आक्रमक पवित्रा कुटुंबीयांनी घेतल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले आहे. मृतक रमाकांत शुक्ला हे सामाजिक वनीकरण विभागात वनपाल म्हणून कार्यरत होते. त्यांनी तब्बल ३० वर्षे विभा गात निष्कलंक सेवा दिली. मात्र, प्रशासनातील भ्रष्ट आणि आडमुठ्या कार्यपद्धतीमुळे त्यांना हक्काच्या वेतनासाठी अक्षरशः दारोदार भटकावे लागत होते. हक्काचे वेतन मिळवण्यासाठी त्यांनी प्रशासकीय पातळीवर सर्व मार्गांनी पाठपुरावा केला.



अखेर व्यवस्थेकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी न्यायालयाचे दरवाजे ठोठावले होते. न्यायालयानेही शुक्ला यांच्या बाजूने निकाल देत त्यांचे थकीत वेतन देण्याचे स्पष्ट आदेश प्रशासनाला दिले होते. मात्र, न्यायालयाचा आदेश हातात अ सूनही सामाजिक वनीकरण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांना वेतन देण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ केली. उलट न्यायालयाचा आदेश घेऊन कार्यालयात जाणाऱ्या शुक्ला यांना वरिष्ठांच्या मानसिक छळाला आणि अपमानास्पद वागणुकीला सामोरे जावे लागत होते. अखेर हक्काच्या घामाचा मोबदला मिळत नसल्याने आणि वरिष्ठांच्या त्रासाला कंटाळून त्यांनी चार दिवसांपूर्वी टोकाचे पाऊल उचलत विषारी औषध प्राशन केले होते. गंभीर अवस्थेत यवतमाळ येथील शासकीय रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. मात्र, आज उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. आत्महत्येपूर्वी रमाकांत शुक्ला यांनी लिहिलेली एक सविस्तर सुसाइड नोट समोर आली असून, त्यात त्यांनी सामाजिक वनीकरण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांवर अत्यंत गंभीर आणि थेट आरोप केले आहेत. ३० वर्षांची सेवा देऊनही वेतन न देणे, न्यायालयाचा निकाल आल्यानंतरही अडवणूक करणे आणि फाइल पुढे सरकवण्यासाठी सातत्याने मानसिक त्रास देणे, अशा छळाची संपूर्ण कहाणी त्यांनी या चिठ्ठीत मांडली आहे. या सुसाइड नोटमुळे सामाजिक वनीकरण विभागातील अधिकाऱ्यांची मुजोरी चव्हाट्यावर आली आहे.शुक्ला यांच्या मृत्यूनंतर संतप्त झालेल्या नातेवाईकांनी आणि वन विभागातील सहकाऱ्यांनी थेट जिल्हाधिकारी कार्यालयाकडे धा व घे तली. रुग्णवाहिकेतून मृतदेह जिल्हाधिकारी कार्यालया च्या आ वारात आणून ठेवण्यात आ ला . यावेळी नातेवाईकां नी प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. "माझ्या वडिलांनी आयुष्यभर प्रामाणिकपणे नोकरी केली. न्यायालयात केस जिंकूनही अधि काऱ्यांनी त्यांना वेतनासाठी भीक मागायला लावली.

वरिष्ठां च्या रो जच्या त्रासानेच माझ्या वडि लां चा जीव घेतला आहे. जोपर्यंत सामाजिक वनीकरण विभागाच्या सं बंधित मुजोर अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दा खल क रून त्यांना अटक केली जात ना ही, तोपर्यंत आम्ही मृतदेहाव र अंत्यसंस्कार करणार नाही," अ सा आक्रंद रमाकांत शुक्ला यां च्या मुलीने केला. एका शासकीय क र्मचाऱ्याचा मृतदेह थेट जि ल्हाधिकारी कार्यालयात आणल्याची माहिती मिळताच पोलीस दल आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची मोठी धावपळ उडाली. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर आणि आवारात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. संतप्त नातेवाईकांची समजूत काढण्यासाठी वरिष्ठ पोलीस



अधिकारी आणि महसूल अधिकारी प्रयत्न करत आहेत; मात्र कुटुंबीय कारवाईच्या लेखी आश्वासनावर ठाम आहेत.

एकीकडे शासन कर्मचाऱ्यांच्या कल्याणाच्या गप्पा मारत असताना, दुसरीकडे ३० वर्षे सेवा दि लेल्या कर्मचाऱ्याला वेतनासाठी न्यायालयात जाऊनही आत्महत्या करावी लागणे, ही पुरोगामी महाराष्ट्राच्या प्रशासकीय व्यवस्थेला काळिमा फासणारी घटना मानली जात आहे. आता या प्रकरणात जिल्हा प्रशासन आणि वन विभागाचे वरिष्ठ दोषी अधिकाऱ्यांवर काय कारवाई करतात, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# प्रलंबित पीक विम्यासाठी शेतकऱ्यांचे ठिय्या आंदोलन

**तालुका कृषी कार्यालयासमोर आंदोलन; लेखी आश्वासन मिळेपर्यंत हटणार नसल्याचा इशारा**



*यवतमाळ सत्ता, प्रतिनिधी

**दारव्हा** : तालुक्यातील शेतकऱ्यांचा सन २०२५ मधील प्रलंबित पीक विमा तातडीने त्यांच्या बँक खात्यात जमा करावा, या मागणीसाठी क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने सोमवार (ता. २४) तालुका कृषी अधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन सुरू करण्यात आले. पीक विम्याची रक्कम जमा करण्याबाबत लेखी आश्वासन मिळेपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

तालुक्यातील कापूस, सोयाबीनसह अन्य पिकांच्या सन २०२५ मधील खरीप व रब्बी हंगामातील पीक विम्याचा प्रश्न अद्याप प्रलंबित आहे. नैसर्गिक आपत्ती आणि पिकांचे नुकसान झाल्यानंतर शेतकऱ्यांनी शासनाच्या धोरणानुसार पीक विमा भरला होता. मात्र, विमा कंपनीची कार्यपद्धती आणि प्रशासकीय दिरंगाईमुळे अनेक पात्र शेतकऱ्यांना अद्याप नुकसानभरपाई मिळालेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी असून आर्थिक अडचणी वाढल्या आहेत. प्रलंबित पीक विम्याची रक्कम तालुक्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर कोणताही विलंब न करता जमा करावी, या मागणीचे निवेदन संघटनेच्या वतीने १७ ऑगस्ट रोजी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाला देण्यात आले होते. तसेच २३ ऑगस्टपर्यंत विमा कंपनी आणि प्रशासनाने ठोस निर्णय न घेतल्यास २४ ऑगस्टपासून ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला होता.मात्र, निर्धारित मुदतीत मागणीबाबत कोणताही ठोस निर्णय न झाल्याने सोमवारी सकाळी ११ वाजता तालुका कृषी अधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन सुरू करण्यात आले. प्रलंबित पीक विम्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याचे लेखी आश्वासन मिळेपर्यंत कार्यालयातून हटणार नसल्याचे आंदोलकांनी स्पष्ट केले.

या आंदोलनात क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे विदर्भ उपाध्यक्ष प्रशांत सुरस्कार, तालुकाध्यक्ष प्रेम राठोड, संघटक शाहेद अहेमद शेख, मोहम्मद वसीउल्ला, सदाशिव उंबरकर, अनिल राठोड, मोहम्मद खालीद, संदीप धोटे, सैय्यद हारून, प्रकाश बाबल, प्रभाकर राठोड, मानिक राठोड, सुनील चव्हाण यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व शेतकरी सहभागी झाले.

# जिल्हा वार्षिक योजनांतर्गत 821 कोटींचे नियोजन

**▪ मागील आर्थिक वर्षाचा निधी 100 टक्के खर्च;जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत पालकमंत्री संजय राठोड यांनी घेतला आढावा**

*यवतमाळ सत्ता, प्रतिनिधी

**यवतमाळ** : जिल्ह्याच्या विकासाला गती देण्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत सन 2026-27 साठी सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना आणि आदिवासी उपयोजना अशा तीन योजनांसाठी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत एकूण रु.821 कोटींचे नियोजन करण्यात आले आहे. त्यापैकी आतापर्यंत 492.60 कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. दरम्यान, सन 2025-26 मध्ये प्राप्त झालेला निधी निर्धारित उद्दिष्टानुसार 100 टक्के खर्च करण्यात आला असल्याची माहिती पालकमंत्री संजय राठोड यांनी दिली.

त्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात जिल्हा नियोजन समितीची बैठक झाली. यावेळी जिल्ह्यातील विविध विकासकामे, योजनांची अंमलबजावणी, निधी खर्च आणि प्रलंबित कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. बैठकीस आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, खासदार संजय देशमुख, खासदार नागेश पाटील आष्टीकर, खासदार प्रतिभा धानोरकर, आमदार धीरज लिंगाडे, आमदार दुष्यंत चतुर्वेदी, आमदार किसन वानखेडे, आमदार राजू तोडसाम, आमदार संजय देरकर, आमदार बाळासाहेब मांगुळकर, जिल्हाधिकारी विकास मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे, प्रकल्प अधिकारी रेवैयाह डोंगरे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक



अशोक थोरात, समाज कल्याण सहायक आयुक्त मंगला मुन, जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर आडे यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

५ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीतील निर्देशांच्या अनुपालनाचा यावेळी आढावा घेण्यात आला. तसेच सन २०२५-२६ मध्ये जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना आणि आदिवासी उपयोजनेंतर्गत मार्चअखेर झालेल्या खर्चास मान्यता देण्यात आली.

**प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करा**

पालकमंत्री संजय राठोड यांनी प्रगतिपथावरील कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले. "कामे दर्जेदार झाली पाहिजेत. प्रलंबित कामे मुदतीत पूर्ण झाली नाहीत तर संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरले जाईल," असा इशारा त्यांनी दिला. डीपीसीच्या कामांचा यापुढे दर दोन महिन्यांनी आढावा घेण्यात येणार असून मुदत संपूनही कामे पूर्ण न झाल्यास संबंधित विभागाच्या सचिवांना याबाबत कळविण्यात येईल. तसेच संबंधित अधिकाऱ्यांच्या सेवा पुस्तकात नोंद करून वेतनवाढ थांबविण्याची शिफारस करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. प्रशासनाने विकासकामांकडे गांभीर्याने पाहून कामांना गती द्यावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

**रस्ते तपासणीसाठी दक्षता पथक**

जिल्ह्यातील रस्त्यांच्या गुणवत्तेची तपासणी करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीचे दक्षता पथक स्थापन करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. स्मशानभूमीसाठी आवश्यक जागा एका महिन्यात उपलब्ध करून देण्याचे निर्देशही पालकमंत्र्यांनी दिले. जिल्ह्यात उभारण्यात येणाऱ्या विविध प्रकल्पांसाठी शासकीय जमीन उपलब्ध करून देताना लोकप्रतिनिधींच्या सूचना व हरकतींचा विचार करावा, असेही त्यांनी प्रशासनाला सांगितले.

**पीकविमा रक्कम मिळण्यासाठी केंद्राकडे प्रस्ताव पाठविणार**

यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीकविमा रक्कम मिळण्यासंदर्भात मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा झाली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे या विषयावर सकारात्मक आहेत. याबाबतचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविण्याचा निर्णय झाल्याची माहिती पालकमंत्र्यांनी दिली. दहेली दुर्घटनेप्रकरणी कारवाईचे निर्देश दारव्हा तालुक्यातील दहेली येथील दुर्घटनेतील जबाबदार विभाग आणि अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याचे निर्देशही पालकमंत्री संजय राठोड यांनी दिले. तसेच कृषी सोलर पंपासंदर्भातील तक्रारींची जिल्हाधिकारी यांनी सविस्तर आढावा घ्यावा, असेही त्यांनी सांगितले.

या बैठकीत स्मार्ट मीटर, रस्त्यांवरील मटण दुकाने, शववाहिनी, महात्मा फुले नाट्यगृह, शिवसृष्टी, शहरातील सिग्नल, जलजीवन मिशन आदी विषयांवर चर्चा करून तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले.

**जिल्हा वार्षिक योजनांसाठी 821 कोटी**

जिल्हाधिकारी विकास मीना यांनी दिलेल्या माहितीनुसार, सन 2025-26 मध्ये जिल्हा वार्षिक योजनेच्या सर्वसाधारण घटकासाठी 528 कोटी रुपयांची तरतूद मंजूर व प्राप्त झाली असून त्यापैकी 100 टक्के निधी खर्च झाला आहे. अनुसूचित जाती उपयोजनेसाठी मंजूर व प्राप्त झालेल्या 84 कोटी रुपयांचाही 100 टक्के खर्च झाला आहे. आदिवासी उपयोजनेसाठी 142.38 कोटी रुपयांची तरतूद मंजूर व प्राप्त झाली. काही तांत्रिक अडचणींमुळे आस्थापना विषयक बाबींवरील खर्च होऊ न शकल्याने 142.18 कोटी रुपये म्हणजेच 99.86 टक्के निधी खर्च झाला आहे. सन 2026-27 साठी सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना आणि आदिवासी उपयोजना या तीनही घटकांसाठी मिळून 821 कोटी रुपयांची मंजूर तरतूद आहे.

# कीटकनाशक फवारणीवेळी सुरक्षिततेला प्राधान्य द्या

**▪ यवतमाळ जिल्ह्यात कृषी विभागाची व्यापक जनजागृती; २५ प्रशिक्षणांत ४८० शेतकरी-शेतमजुरांचा सहभाग**

*यवतमाळ सत्ता, प्रतिनिधी

**यवतमाळ** : जिल्ह्यात कीटकनाशक फवारणीदरम्यान विषबाधा होण्याच्या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने सुरक्षित फवारणीबाबत व्यापक जनजागृती मोहीम सुरू केली आहे. संबंधित प्रकरणातील रुग्णास तातडीने आवश्यक वैद्यकीय उपचार देण्यात आले असून उपचार पूर्ण झाल्यानंतर रुग्णास रुग्णालयातून सुटी देण्यात आल्याची माहिती कृषी विभागाने दिली. दरम्यान, शेतकरी व शेतमजुरांनी कीटकनाशकांची फवारणी करताना आवश्यक खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली आणि



संबंधित संस्थांच्या सहकार्याने जिल्ह्यात १ जुलै ते २० ऑगस्ट २०२६ या कालावधीत 'सुरक्षित फवारणी अभियान' राबविण्यात आले. या अभियानांतर्गत शेतकरी व शेतमजुरांना कीटकनाशकांची सुरक्षित हाताळणी, औषधाची योग्य मात्रा, फवारणीची पद्धत, वैयक्तिक संरक्षण साधनांचा वापर, तसेच विषबाधेची लक्षणे आणि प्राथमिक उपाययोजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

अहवाल कालावधीत जिल्ह्यात २५ प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आले असून, त्यात ४८० शेतकरी व शेतमजुरांनी सहभाग घेतला. तसेच ३३ शेतकरी व शेतमजुरांचे वैयक्तिक सुरक्षितता, संरक्षक साधनांचा वापर, फवारणीनंतरची स्वच्छता आणि विषबाधेची लक्षणे आढळल्यास तातडीने वैद्यकीय मदत घेण्याबाबत समुपदेशन करण्यात आले.

जिल्ह्यातील १६ तालुक्यांमधील शेतकऱ्यांना एसएमएसद्वारे सुरक्षित फवारणीसंदर्भातील संदेश पाठविण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. गावपातळीवर ५५ पोस्टर्स लावण्यात आले असून, सुरक्षित फवारणी व विषबाधा टाळण्याबाबत जनजागृती केली जात आहे. याशिवाय १६ हजार २५० माहितीपत्रिकांचे वितरण करण्यात आले आहे. प्रसिद्धी वाहनाद्वारे ३३८ गावांमध्ये भेटी देऊन शेतकरी व शेतमजुरांना सुरक्षित फवारणीचे महत्त्व समजावून सांगण्यात आले.

फवारणी करताना मास्क, हातमोजे, चष्मा, पूर्ण बाह्यांचे कपडे यांसह वैयक्तिक संरक्षण साधनांचा वापर करावा. कीटकनाशकाच्या बाटलीवरील लेबलवरील सूचना व शिफारशीत मात्रा वाचूनच औषधाचा वापर करावा. फवारणीवेळी खाणे, पिणे व धूम्रपान टाळावे. वाऱ्याच्या दिशेचा विचार करून फवारणी करावी. शिफारशीपेक्षा अधिक प्रमाणात औषध वापरू नये तसेच विविध कीटकनाशके मनमानी पद्धतीने मिसळू नयेत. फवारणीदरम्यान चक्कर येणे, मळमळ, उलटी, डोकेदुखी, डोळ्यांची जळजळ किंवा श्वास घेण्यास त्रास जाणवल्यास फवारणी तात्काळ थांबवून जवळच्या शासकीय अथवा मान्यताप्राप्त रुग्णालयात उपचार घ्यावेत. फवारणीनंतर हात, चेहरा व शरीर स्वच्छ धुवावे आणि फवारणीचे कपडे स्वतंत्रपणे धुवावेत. दरम्यान, शेतकरी व शेतमजुरांना संरक्षक किट उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया सुरू असून, उपलब्धतेनुसार पात्र व गरजू लाभार्थ्यांना टप्प्याटप्प्याने किटचे वितरण करण्यात येणार आहे. सुरक्षित फवारणीबाबत जनजागृती व प्रतिबंधात्मक उपाययोजना यापुढेही सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.

# अरुणावती प्रकल्पाजवळ झाडाला गळफास लावून इसमाची आत्महत्या

*यवतमाळ सत्ता, प्रतिनिधी

**दिग्रस** : जुना दिग्रस-दारव्हा मार्गावरील अरुणावती प्रकल्प परिसरात निंबाच्या झाडाला नायलॉनच्या दोरीने गळफास घेऊन ४५ वर्षीय इसमाने जीवन संपवल्याची धक्कादायक घटना सोमवार, दि. २४ ऑगस्ट रोजी पहाटे साडेतीन वाजताच्या सुमारास घडली. या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून, आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

याला सोनमल राजू (वय ४५), रा. खोलाटी, ता. कोमाटी लंका येळुरू, जि. पश्चिम गोदावरी, आंध्र प्रदेश, असे मृताचे नाव आहे. याला सोनमल राजू हे अरुणावती प्रकल्प परिसरात मच्छी पकडण्याचे काम करून उदरनिर्वाह करीत होते. दरम्यान, सोमवारी पहाटे त्यांनी प्रकल्पाजवळील



निंबाच्या झाडाला नायलॉनच्या दोरीच्या साहाय्याने गळफास घेत आत्महत्या केली.

घटनेची माहिती मिळताच दिग्रस पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी दिग्रस ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला. शवविच्छेदनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मृतदेह नातेवाइकांच्या ताब्यात देण्यात आला. दरम्यान, याला सोनमल राजू यांनी एवढे टोकाचे पाऊल नेमके कोणत्या कारणातून उचलले, याचा उलगडा अद्याप झालेला नाही. पोलिस तपासातून आत्महत्येचे कारण स्पष्ट होण्याची शक्यता आहे. त्यांच्या पश्चात पत्नी व दोन मुली असा परिवार आहे.

# अंतराळ नेतृत्वाची दिशा

अंतराळाकडे पाहण्याची भारताची दृष्टी आता बदलत आहे. एकेकाळी अंतराळ म्हणजे 'इस्रो', रॉकेट आणि उपग्रह एवढ्यापुरतीच मर्यादित असलेली संकल्पना आता रॉकेटपासून कृत्रिम बुद्धिमत्ता, उपग्रह डेटापासून हवामान अंदाज, शेतीपासून पर्यावरण आणि अंतराळातील कचरा व्यवस्थापनापासून राष्ट्रीय सुरक्षेपर्यंत विस्तारली आहे. या बदलत्या चित्रात सर्वांत आशादायी बाब म्हणजे खासगी उद्योग आणि स्टार्टअप्सचा वाढता सहभाग. नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील २० स्वदेशी स्पेस-टेक स्टार्टअप्सच्या संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी केलेला संवाद हा या बदलत्या प्रवासाचा महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. ही केवळ औपचारिक भेट नव्हती. भारताच्या अंतराळ क्षेत्राचा पुढचा टप्पा कोणता असावा, खासगी उद्योगांनी कोणत्या दिशेने वाटचाल करावी आणि अंतराळ तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष उपयोग सामान्य नागरिकांच्या जीवनात कसा वाढवता येईल, याचा व्यापक विचार या बैठकीतून पुढे आला. सरकारी नेतृत्वाखाली विकसित झालेल्या अंतराळ क्षेत्राला आता खासगी गुंतवणूक, नवकल्पना, वेग आणि व्यावसायिक दृष्टिकोनाची जोड मिळत आहे. भारताच्या स्पेस-टेक क्षेत्रासाठी ही नवी सुरुवात आहे. या बैठकीत सहभागी कंपन्या, स्टार्टअपच्या नावांकडे पाहिले, तरी भारतीय खासगी अंतराळ क्षेत्राची व्याप्ती किती वेगाने वाढत आहे, याची कल्पना येते. या कंपन्यांचे काम केवळ रॉकेट किंवा उपग्रह बनविण्यापुरते मर्यादित नाही. रॉकेट, पुनर्वापर करता येणारी प्रक्षेपण वाहने, उपग्रह, एव्हिएशन इकॉनॉमिक्स, अत्याधुनिक प्रणोदन प्रणाली, पृथ्वी निरीक्षण, अंतराळातील गुप्तचर तंत्रज्ञान, अंतराळातील कचरा हटविणे, उपग्रह डेटाचे विश्लेषण तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित हवामान आणि पर्यावरणविषयक माहिती अशा अनेक क्षेत्रांत भारतीय स्टार्टअप्स काम करत आहेत. यातून एक महत्त्वाचा बदल स्पष्ट होतो. भारतातील खासगी अंतराळ उद्योग आता एखाद्या विशिष्ट उत्पादनापुरता मर्यादित राहिलेला नाही. रॉकेट तयार करण्यापासून ते अंतराळातून मिळणाऱ्या डेटाचा अर्थपूर्ण वापर करण्यापर्यंत संपूर्ण स्पेस-टेक इकोसिस्टम उभारण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. या परिसंस्थेत संशोधन, उत्पादन, डेटा, सॉफ्टवेअर, कृत्रिम बुद्धिमत्ता, प्रक्षेपण सेवा आणि व्यावसायिक अनुप्रयोग यांचा समावेश होत आहे. खासगी उद्योगासाठी अंतराळ क्षेत्र खुले करण्यामागे सरकारची भूमिका स्पष्ट आहे. 'इस्रो'ने अनेक दशकांच्या संशोधनातून उभारलेल्या क्षमतेला आता खासगी उद्योगाच्या गुंतवणुकीची, वेगाची आणि नवकल्पनांची जोड मिळावी, हा त्यामागचा प्रमुख उद्देश आहे. पंतप्रधान मोदी यांनी अंतराळ स्टार्टअप्सच्या उद्योजकांचे अभिनंदन करताना त्यांनी दाखवलेल्या धाडसाचे कौतुक केले. नवे क्षेत्र स्वीकारताना जोखीम घ्यावी लागते. त्यासाठी सरकारच्या धोरणांवर विश्वास असणे आवश्यक असते. खासगी उद्योगांनी अंतराळ क्षेत्रात प्रवेश करून हा विश्वास दाखवला आहे. सरकारनेही धोरणांमध्ये सातत्य ठेवून उद्योजकांना अनुकूल वातावरण देण्याची भूमिका घेतली आहे. या परस्पर विश्वासातूनच दीर्घकालीन उद्योग उभे राहतात. अंतराळ क्षेत्रातील खासगी कंपन्यांची वाढ ही 'इस्रो'च्या भूमिकेला पर्याय निर्माण करण्यासाठी नसून तिच्या क्षमतेला पूरक ठरण्यासाठी आहे. 'इस्रो'ने मूलभूत संशोधन, अत्याधुनिक तंत्रज्ञान, राष्ट्रीय महत्त्वाच्या मोहिमा आणि दीर्घकालीन वैज्ञानिक उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित करावे, तर खासगी क्षेत्राने व्यावसायिक उत्पादन, सेवा आणि जागतिक बाजारपेठेतील संधींचा विस्तार करावा, अशी भूमिका अधिक प्रभावी ठरू शकते. अंतराळ संशोधनाचे अंतिम यश हे केवळ एखादे रॉकेट यशस्वीपणे अवकाशात पोहोचले किंवा उपग्रह कक्षेत स्थापित झाला यावर ठरत नाही. त्या तंत्रज्ञानाचा पृथ्वीवरील नागरिकांच्या जीवनाला किती फायदा होतो, यालाही तितकेच महत्त्व आहे. याच विचारावर पंतप्रधानांनी विशेष भर दिला. उपग्रहांकडून शेतकऱ्यांना पिकांची स्थिती वेळेवर समजली, पाण्याच्या उपलब्धतेचा अचूक अंदाज आला आणि हवामानातील बदलांची पूर्वसूचना मिळाली, तर शेतीतील जोखीम कमी होऊ शकते. पूर, वणवा किंवा इतर नैसर्गिक आपत्तींची पूर्वसूचना आणि त्यानंतरच्या नुकसानीचे अचूक मूल्यांकन करण्यासाठीही हे तंत्रज्ञान महत्त्वाचे आहे.

# माती जपा, पाणी वाचवा, सुरक्षित महाराष्ट्र घडवा

## लाखो पावलांनी आकार घेतलेली जलसंधारणाची लोकचळवळ

**३६ जिल्ह्यांत एकाचवेळी ‘महा वॉकथॉन – वॉक फॉर वॉटर’; तीन लाखांहून अधिक नागरिकांच्या सहभागातून माती-पाणी संवर्धनाचा महाराष्ट्रव्यापी जागर**

**“नगरेचि रचावीं । जळाशये निर्मावी ।**
**महावने लावावीं । नानाविधं ॥”**
**— संत ज्ञानेश्वर महाराज**



प्रतिवेध
लेखक : पराग उमाकांत पिंगळे

संत ज्ञानेश्वर महाराजांनी शतकांपूर्वी जलाशयांची निर्मिती आणि वनसंपदेच्या संवर्धनाचा दिलेला हा संदेश आजच्या काळात अधिकच समर्पक ठरतो. हवामान बदल, अनियमित पर्जन्यमान, घटती भूजल पातळी आणि जमिनीची धूप या आव्हानांच्या पार्श्वभूमीवर ‘माती जपा, पाणी वाचवा आणि सुरक्षित महाराष्ट्र घडवा’ हा विचार आता केवळ घोषणा न राहता व्यापक लोकचळवळ बनण्याची गरज आहे. याच विचाराला कृतीची जोड देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या मृद व जलसंधारण विभागाने २१ ऑगस्ट रोजी राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांत एकाचवेळी *‘महा वॉकथॉन २०२६ – वॉक फॉर वॉटर’*चे आयोजन केले. मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमाला तीन लाखांहून अधिक नागरिकांनी प्रतिसाद दिला. एका सरकारी विभागाचा उपक्रम लाखो नागरिकांच्या सहभागातून लोकचळवळीचे स्वरूप घेऊ शकतो, याचे हे प्रभावी उदाहरण ठरले.

तीन लाख नागरिक, सहा लाख पावले आणि एक महाराष्ट्र तीन लाखांहून अधिक नागरिक एकाच दिवशी, एकाच उद्देशाने महाराष्ट्रभर चालले. विद्यार्थी, शेतकरी, महिला, कर्मचारी, युवक, खेळाडू, सामाजिक संस्था आणि सर्वसामान्य नागरिक अशा समाजातील विविध घटकांनी माती आणि पाण्यासाठी पावले टाकली. तीन लाख नागरिक म्हणजे सहा लाख पावले एका संकल्पासाठी पुढे पडली. प्रत्येक सहभागीने तीन किलोमीटरचा वॉक पूर्ण केल्याचा विचार केला तर तीन लाख नागरिकांनी मिळून सुमारे नऊ लाख व्यक्ती-किलोमीटरचा सामूहिक प्रवास केला. मात्र या उपक्रमाचे महत्त्व किलोमीटरच्या गणितात मोजण्यापेक्षा महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचलेल्या संदेशात आहे. त्या दिवशी प्रत्येक पाऊल मातीच्या संरक्षणासाठी होते, प्रत्येक पाऊल पाण्याच्या संवर्धनासाठी होते आणि प्रत्येक पाऊल भावी पिढ्यांसाठी सुरक्षित महाराष्ट्र घडविण्याच्या संकल्पासाठी होते. माती जपा... पाणी वाचवा... सुरक्षित महाराष्ट्र घडवा! हा संदेश घोषणेपुरता न राहता लाखो नागरिकांच्या प्रत्यक्ष सहभागातून व्यक्त झाला. अरबी समुद्राच्या कुशीतून निघालेली पाण्याची हाक मुंबईत वरळीच्या समुद्राच्या साक्षीने मुख्य वॉकथॉनला सुरुवात झाली. एका बाजूला अथांग अरबी समुद्र आणि दुसऱ्या बाजूला पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे महत्त्व सांगण्यासाठी एकत्र आलेले हजारो नागरिक—हे दृश्यच या अभियानाचा आशय सांगणारे होते. वरळीच्या किनाऱ्यावरून निघालेली माती-पाणी संवर्धनाची ही हाक त्याचवेळी राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांत उमटत होती. मुंबईतील मुख्य कार्यक्रमात मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर सहभागी झाले. क्रिकेटपटू इरफान पठाण, गायक संजू राठोड, अभिनेते पुष्कर श्रोत्री आणि दिग्दर्शक अनिल शर्मा यांसारख्या लोकप्रिय व्यक्तिमत्त्वांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे या संदेशाला अधिक व्यापकता मिळाली. पण या उपक्रमाचा खरा चेहरा कोण होता, असा प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर एकच आहे—सामान्य नागरिक. राजकीय झगमगाट नव्हे, जनतेची ताकद सरकारी उपक्रम यशस्वी करण्यासाठी मोठ्या राजकीय नेत्यांची गर्दी, भव्य व्यासपीठ किंवा राजकीय झगमगाट आवश्यक असतो, या पारंपरिक चौकटीला ‘महा वॉकथॉन’ने छेद दिला. विविध लोकप्रतिनिधी, सामाजिक क्षेत्रातील व्यक्ती आणि सेलिब्रिटी या अभियानात सहभागी झाले; मात्र कार्यक्रमाचे केंद्रस्थान ते नव्हते. केंद्रस्थानी होती माती, पाणी आणि जनता. मुंबईपासून यवतमाळपर्यंत, गडचिरोलीपासून कोकणापर्यंत, विदर्भापासून पश्चिम महाराष्ट्रापर्यंत विविध विचारांचे, विविध सामाजिक घटकांतील नागरिक एकाच उद्देशासाठी चालले. राजकीय कार्यक्रमात गर्दी जमणे आणि एका सामाजिक उद्देशासाठी नागरिकांनी उत्स्फूर्तपणे बाहेर पडणे यात मूलभूत फरक असतो. महा वॉकथॉनच्या यशाचे मूल्यमापन करताना हाच फरक सर्वाधिक महत्त्वाचा ठरतो. मंचावर कोण उभे होते यापेक्षा माती-पाण्यासाठी रस्त्यावर किती नागरिक उतरले, ही या अभियानाची खरी ताकद ठरली. मंत्रालयातून जनतेच्या मनात पोहोचले जलसंधारण महा वॉकथॉनमागे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी मांडलेली भूमिका महत्त्वाची होती. जलसंधारणासारखी संकल्पना मंत्रालयाच्या चार भिंतींत बसून व्यापक लोकचळवळ बनू शकत नाही. त्यासाठी नागरिकांना आणि विशेषतः नव्या पिढीला प्रत्यक्ष या प्रक्रियेत सहभागी करून घेणे आवश्यक आहे. याच भूमिकेतून *‘वॉक फॉर वॉटर’*ची संकल्पना आकाराला आली. जलसंधारण हा केवळ पाणीटंचाई किंवा दुष्काळाच्या काळात चर्चिला जाणारा विषय नसून तो प्रत्येक नागरिकाच्या दैनंदिन जीवनाशी जोडला गेला पाहिजे. पाऊस किती पडतो यापेक्षा पडलेल्या पाण्यापैकी आपण किती अडवतो, किती जमिनीत जिरवतो आणि किती शाश्वत पद्धतीने वापरतो, हे भविष्यात अधिक निर्णायक ठरणार आहे. ‘जेन झी’ला जोडणारा नवा प्रयोग या अभियानाची विशेष जमेची बाजू म्हणजे तरुण पिढीचा उत्स्फूर्त सहभाग. आजची ‘जेन झी’ पिढी सोशल मीडिया, रिल्स आणि डिजिटल माध्यमांशी जोडलेली आहे. त्यामुळे केवळ पारंपरिक भाषणे आणि जाहिरातींच्या माध्यमातून त्यांच्यापर्यंत पोहोचण्याऐवजी त्यांच्या भाषेत आणि त्यांच्या माध्यमातून माती-पाण्याचा विषय मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला. याच विचारातून ‘जल-मृद संवर्धन जनजागृती रिल स्पर्धा’ या अभिनव उपक्रमाची जोड देण्यात आली. तरुणांनी माती आणि पाणी संवर्धनावर आपल्या कल्पकतेतून रिल्स तयार कराव्यात, सोशल मीडियाच्या माध्यमातून हा संदेश अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवावा आणि त्याचवेळी प्रत्यक्ष वॉकथॉनमध्येही सहभागी व्हावे, असा डिजिटल आणि प्रत्यक्ष लोकसहभागाचा अनोखा संगम घडविण्यात आला. या रिल स्पर्धेत आतापर्यंत चार हजारांहून अधिक रिल्स प्राप्त झाल्या असून त्यांना लाखो व्ह्यूज मिळाले आहेत. यातून जल-मृद संवर्धनाचा विषय नव्या पिढीच्या डिजिटल विश्वातही पोहोचला.

**नव्या पिढीसमोर यातून एक साधा, पण दूरगामी विचार ठेवण्यात आला—**
**आज माती जपली, तर उद्याची शेती सुरक्षित राहील.**
**आज पाणी वाचवले, तर उद्याची पिढी जलसुरक्षित राहील.**
**आणि माती-पाणी दोन्ही जपले, तरच सुरक्षित महाराष्ट्र घडेल.**

**स्व. सुधाकरराव नाईक यांच्या विचारांना कृतीतून अभिवादन**

महाराष्ट्राच्या जलसंधारणाच्या इतिहासात माजी मुख्यमंत्री स्व. सुधाकरराव नाईक यांचे योगदान महत्त्वपूर्ण राहिले आहे. त्यांच्या जयंतीचे औचित्य साधून २१ ऑगस्ट हा जलसंधारण दिन म्हणून साजरा करताना केवळ अधिकारी-कर्मचाऱ्यांचा औपचारिक कार्यक्रम घेण्याऐवजी सामान्य नागरिकांना या विषयाशी प्रत्यक्ष जोडण्याचा निर्णय महत्त्वाचा ठरला. महापुरुषांच्या विचारांना केवळ भाषणातून अभिवादन करण्यापेक्षा त्या विचारांना वर्तमानकाळाशी जोडून प्रत्यक्ष कृती करणे अधिक अर्थपूर्ण ठरते. महा वॉकथॉनमधून स्व. सुधाकरराव नाईक यांच्या जलसंधारणाच्या विचाराला नव्या पिढीच्या सहभागाची जोड मिळाली, हे या उपक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणावे लागेल. जलसंधारण म्हणजे केवळ पाणी साठवणे नव्हे महा वॉकथॉनमधून ‘जलयुक्त शिवार अभियान २.०’, ‘गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार’, ‘अमृत सरोवर’, ‘प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना’, पाणलोट विकास आणि भूजल पुनर्भरण यांसारख्या उपक्रमांमागील व्यापक उद्देश जनतेपर्यंत पोहोचविण्याचाही प्रयत्न झाला. कारण जलसंधारण म्हणजे फक्त बंधारे बांधणे किंवा पाणी साठवणे नाही. जलसंधारण म्हणजे जमिनीची धूप थांबविणे, पावसाचे पाणी जमिनीत जिरविणे, भूजल पातळी वाढविणे, शेतीला संरक्षित सिंचन देणे, गावांचे टँकरवरील अवलंबित्व कमी करणे, शेतकऱ्यांच्या उत्पादनाला स्थैर्य देणे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणे. म्हणूनच “माती जपा, पाणी वाचवा आणि सुरक्षित महाराष्ट्र घडवा” या संकल्पनेत पर्यावरण, शेती, पाणी आणि भावी पिढ्यांचे भविष्य या सर्वांचा एकत्रित विचार आहे. आता सहा लाख पावलांपासून लाखो कृतींकडे महा वॉकथॉन यशस्वी झाला, यात शंका नाही. परंतु कोणत्याही जनजागृती अभियानाचे अंतिम मूल्यमापन एका दिवसाच्या गर्दीवर होत नाही.

**खरा प्रश्न आहे—आता पुढे काय?**

१५ ऑगस्ट २०२६ ते २६ जानेवारी २०२७ या कालावधीत पुढे नेण्यात येणाऱ्या जलसंधारण अभियानाच्या माध्यमातून या जनजागृतीचे प्रत्यक्ष कृतीत रूपांतर करणे, ही पुढची महत्त्वाची पायरी आहे. गावागावांत पाणलोट विकासाची कामे वाढली पाहिजेत. जलस्रोतांचे पुनरुज्जीवन झाले पाहिजे. धरणे आणि तलावांतील गाळ काढला पाहिजे. पावसाचे पाणी जमिनीत जिरविले पाहिजे. भूजल पुनर्भरण वाढले पाहिजे. मातीची धूप रोखली पाहिजे. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे या प्रत्येक कामात लोकसहभाग वाढला पाहिजे. वॉकथॉनमध्ये चाललेला प्रत्येक नागरिक आपल्या गावाचा, परिसराचा आणि समाजाचा ‘जलदूत’ झाला, तर एका दिवसाच्या कार्यक्रमातून वर्षानुवर्षे चालणारी चळवळ निर्माण होऊ शकते. माती-पाण्याच्या संरक्षणातूनच सुरक्षित महाराष्ट्र पाणीटंचाई निर्माण झाल्यानंतर टँकरची व्यवस्था करण्यापेक्षा आज पावसाचे पाणी जमिनीत जिरविणे अधिक शहाणपणाचे आहे. भूजल पातळी खालावल्यानंतर विहिरी अधिक खोल करण्यापेक्षा आज भूजल पुनर्भरण करणे आवश्यक आहे. माती वाहून गेल्यानंतर तिचे महत्त्व समजण्यापेक्षा ती वाहून जाण्याआधी तिचे संरक्षण करणे गरजेचे आहे. कारण माती आणि पाण्याचे संरक्षण ही केवळ सरकारची किंवा एका विभागाची जबाबदारी नाही. ती प्रत्येक नागरिकाच्या जगण्याशी आणि येणाऱ्या पिढ्यांच्या भविष्याशी जोडलेली सामूहिक जबाबदारी आहे. २१ ऑगस्टला महाराष्ट्रातील लाखो नागरिकांनी त्यासाठी पहिले पाऊल टाकले. आता ही पावले शिवारापर्यंत पोहोचली पाहिजेत. पाणलोटापर्यंत पोहोचली पाहिजेत. गावातील तलाव, नाले आणि जलस्रोतांपर्यंत पोहोचली पाहिजेत. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे प्रत्येक नागरिकाच्या मनातील जबाबदारीच्या जाणिवेपर्यंत पोहोचली पाहिजेत.

**माती जपली तर शेती टिकेल.**
**पाणी वाचवले तर जीवन टिकेल.**

शेती आणि जीवन सुरक्षित झाले तर महाराष्ट्र सुरक्षित होईल. तीन लाखांहून अधिक नागरिकांच्या सहा लाख पावलांनी सुरू झालेला हा प्रवास म्हणूनच केवळ एका यशस्वी वॉकथॉनची कहाणी नाही. ‘सरकारी कार्यक्रम ते लोकचळवळ’ असा प्रवास करण्याची क्षमता असलेल्या एका व्यापक अभियानाची ही सुरुवात आहे. आज लाखो पावले चालली आहेत; उद्या लाखो हात जलसंधारणाच्या कामासाठी पुढे आले, तर या उपक्रमाचा खरा उद्देश सफल होईल. आणि तेव्हाच या चळवळीचा संकल्प खऱ्या अर्थाने साकार होईल—माती जपा... पाणी वाचवा... सुरक्षित महाराष्ट्र घडवा!

# काळजी’ देवाघरच्या फुलांची...



बालके ही केवळ कुटुंबाची नव्हे, तर समाजाची आणि राष्ट्राची भावी शक्ती आहेत; त्यांच्या सुरक्षिततेतच देशाच्या उज्ज्वल भवितव्याची बीजे दडलेली आहेत. कोणत्याही समाजाचा पाया म्हणजे बालके. तो पाया जितका निरोगी, सुदृढ आणि विकसित, तितका तो समाज बलवान व उदारमतवादी बनतो. लहान मुले ही समाजात वरदान असतात. मुले ही राष्ट्राची संपत्ती आहेत. मुले राष्ट्राचा भावी आधारस्तंभ असतात. एवढेच नव्हे तर ‘मुले म्हणजे देवाघरची फुले’ असे मानणारी आपली भारतीय संस्कृती. मुलांनी खेळावे, फुलपाखरांमागे धावावे, शाळेत जाऊन शिकावे, नवनवीन गोष्टी आत्मसात कराव्यात. त्यांचे जीवन हळूहळू फुलत राहावे, असा सर्वांचाच दृष्टिकोन आहे. लहान मुलांच्या, बालकांच्या बाबतीत इतका विशाल दृष्टिकोन असणाऱ्या आपल्या देशात अलीकडील काळात बालकांवर होणारे अन्याय-अत्याचार सर्वांच्याच चिंतेचा आणि चिंतनाचा विषय ठरला आहे. शाळेत दहा मिनिटे उशिरा आल्याने इयत्ता सहावीतील विद्यार्थिनीला शिक्षिकेने शंभर उठाबशा काढायला लावल्याने त्या बालिकेस त्रास झाला आणि त्यातूनच त्या मुलीचा मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना वसईच्या एका शाळेत घडली. लहान मुलांवरील वाढत्या लैंगिक अत्याचाराने, तर जणू थैमानच घातले आहे. स्त्री भ्रूणहत्येने तर संपूर्ण देशच पोखरला आहे. देशात बालकांच्या सुरक्षिततेची आणि सर्वांगीण विकासाची काळजी घेणारे अनेक कायदे, धोरणे किंवा उपक्रम, योजना अस्तित्वात आहेत. देशाचे भविष्य आणि भवितव्य असणाऱ्या मुलांच्या हितासाठी शासन आणि समाजाकडून होणारे प्रयत्नही अनुकरणीय आहेत. भारतीय राज्यघटनेच्या १४, १५, २१ (ए), २३, २४, ३९(इ), ३९(फ) या कलमांमध्ये बालकांची वाढ आणि विकास या विषयी तरतुदी आहेत. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्वसाधारण सभेने १९८९ मध्ये जगापुढे बालहक्कांचा करार (बाल हक्कांची सनद) मांडला. भारताने तो करार ११ डिसेंबर १९९२ रोजी स्वीकारला. या करारात एकूण ५४ कलमे आहेत. या कलमांचे चार प्रकारांत वर्गीकरण केले जाते. त्यानुसार बालकांना अस्तित्वाचा हक्क, संरक्षणाचा हक्क, विकासाचा हक्क आणि सहभागाचा हक्क दिला आहे. समाजोपयोगी आणि सामाजिक सेवा मिळवणे बालकांच्या विकासासंबंधी देशात अनेक धोरणे आखण्यात आली आहेत. १९७४ चे राष्ट्रीय बाल धोरण, १९७९ चे आंतरराष्ट्रीय बालक वर्षाचा प्रसार व स्वीकृती, १९८६ चे राष्ट्रीय शिक्षण धोरण, १९९३ चे राष्ट्रीय पोषण धोरण, २००२ चे राष्ट्रीय आरोग्य धोरण, २००३ ची राष्ट्रीय बालक सनद, २००५चा राष्ट्रीय बालक कृती आराखडा, वर्ष २०१३ चा राष्ट्रीय बालक कृती आराखडा, २०१३ चे राष्ट्रीय बालक धोरण, २०१४चा नवजात बालक कृती आराखडा इत्यादींचा यामध्ये समावेश आहे. बालकांच्या विकासासाठी जे कायदे केले आहेत, त्यामध्ये १९९४ चा प्रसूतीपूर्व गर्भजल लिंगनिदान प्रतिबंधक कायदा, २००५ चा बाल हक्क संरक्षण आयोग कायदा, २००६ चा बालविवाह प्रतिबंधक कायदा, २००६ चा अन्नसुरक्षा व प्रमाणीकरण कायदा , २००९ चा बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण अधिकार कायदा, २०१२ चा बालकांचे लैंगिक शोषण विरोधी संरक्षण कायदा (पोक्सो), तसेच पोक्सो सुधारणा विधेयक-२०१९, २०१३ चा राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायदा, २०१५ चा बाल न्याय (बालकांची काळजी व संरक्षण) कायदा, २०१६ चा आधार कायदा आणि २०१६ चा बालकामगार (प्रतिबंध व नियमन) कायदा इत्यादींचा समावेश आहे. भारत सरकारने ८ मार्च २०१७ रोजी ‘बेटी बचाओ, बेटी पढाओ’ योजना देशातील सर्व ६४० जिल्ह्यांसाठी लागू केली आहे. कायदे, तरतुदी, आराखडे, योजना यांची आपल्या देशात प्रचंड रेलचेल आहे, तरीही ही ‘देवाघरची फुले’ असुरक्षित आहेत. तेव्हा याबाबत चिंतन आणि प्रत्यक्ष सकारात्मक कृती होणे गरजेचे आहे. व्यक्ती, कुटुंब आणि समाज या मानवी विकासाच्या पायऱ्या आहेत. सशक्ताने अशक्ताचे संरक्षण करणे व त्याचे जीवन सुसह्य करणे ही आपली संस्कृती आहे. तेव्हा देशातील बालकांसाठी एका सुरक्षित, संरक्षित वातावरणाची निर्मिती करणे, सर्व प्रकारच्या असुरक्षिततेपासून बालकांचे संरक्षण करण्यासाठी, त्यांना सार्वजनिक ठिकाणी सुरक्षित ठेवण्यासाठी योग्य वातावरणाची निर्मिती करणे, ही आपली प्रत्येकाची जबाबदारी आहे. आपले कर्तव्यच आहे. आपली मुले हीच आपल्या देशाचे भवितव्य आहे. तेव्हा मुलांची उपेक्षा म्हणजे देशाच्या, समाजाच्या भविष्याची आणि भवितव्याची उपेक्षा आहे, याची जाणीव आपण सर्वांनाच असायला हवी.

हे वृत्तपत्र, प्रसाद प्रिंटर्स अँड स्टेशनर्स, पोलीस मुख्यालयासमोर यवतमाळ येथे मुद्रित करून प्रकाशक, संपादक, प्रकाशक गणेश नारायणराव खाडसे यांनी दैनिक यवतमाळ सत्ता, आर्मी रोड, अशोक नगर, यवतमाळ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद यवतमाळ न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात.) **English:** This newspaper was printed by Ishwarshah Ratansinh Sengar at Prasad Printers and Stationers, opposite the Police Headquarters, Yavatmal, and published by the owner, editor, and publisher Ganesh Narayanrao Khade at "Dainik Yavatmal Satta", Arni Road, Ashok Nagar, Yavatmal (Maharashtra). (All disputes are subject to the jurisdiction of Yavatmal courts.)

# गौराळा येथे अवैध दारूविक्रीवरून संताप; 7 दिवसांचा इशारा, अन्यथा ठाण्यासमोर उपोषण!

## स्थानिक ग्रामस्थ व महिला आक्रमक; मारेगाव पोलिसांत तक्रार दाखल

*यवतमाळ सत्ता, प्रतिनिधी



**मारेगाव :** तालुक्यातील मौजा गौराळा येथील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या चापली हनुमान मंदिर परिसरातील एका पानठेल्यातून राजरोसपणे सुरू असलेल्या अवैध दारूविक्रीमुळे गावातील सामाजिक शांतता धोक्यात आली आहे. या अवैध धंद्यामुळे स्थानिक तरुण पिढीसह लहान मुलांचे भविष्य उद्ध्वस्त होत असून, हा प्रकार तत्काळ कायमस्वरूपी बंद न झाल्यास पोलीस ठाण्यासमोर तीव्र उपोषण छेडण्याचा इशारा गौराळा ग्रामपंचायत आणि संतप्त ग्रामस्थांनी मारेगाव पोलिसांना दिला आहे.

पानठेल्याच्या नावाखाली अवैध दारू विक्री गौराळा हद्दीतील चापली हनुमान मंदिर हे परिसरातील भाविकांचे मोठे श्रद्धास्थान आहे. मात्र, याच मंदिर परिसरातील पानठेल्यामधून उघडपणे दारूची विक्री केली जात आहे. या अवैध धंद्यामुळे मंदिरात येणाऱ्या महिला व भाविकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. इतकेच नव्हे तर लहान मुले आणि तरुणांना व्यसनाची चटक लागल्याने अनेक संसार उद्ध्वस्त होण्याच्या उंबरठ्यावर पोहोचले आहेत. गावात मद्यधुंद अवस्थेतील उपद्रव आणि अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप उसळला आहे.

कारवाईसाठी ७ दिवसांची मुदत या गंभीर प्रकाराची दखल घेत गौराळा ग्रामपंचायतीने मारेगाव पोलीस ठाण्यात धडक देत ठाणे अंमलदारांना लेखी तक्रारवजा निवेदन सादर केले. येत्या ७ दिवसांच्या आत या अवैध दारू विक्रीवर कडक कायदेशीर कारवाई करून हा अड्डा कायमचा बंद करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. दिलेल्या मुदतीत कारवाई न झाल्यास ग्रामपंचायतीचे सर्व पदाधिकारी व ग्रामस्थ मारेगाव पोलीस ठाण्यासमोर बेमुदत उपोषणाला बसतील आणि त्यातून उद्भवणाऱ्या सर्व परिस्थितीची जबाबदारी पोलीस प्रशासनाची राहील, असा थेट इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. स्थानिक महिला व पदाधिकाऱ्यांची स्वाक्षरी या निवेदनावर गौराळा गावच्या सरपंच मयुरी चंद्रकांत धोबे, उपसरपंच अतुल परशराम गानफाडे, ग्रामपंचायत सदस्य अनिता दीपक कोयचाडे, सुरेखा योगीराज कोडापे, शारदा बंडू येरकाडे, झुली किशोर राऊत, अर्चना संतोष मडकाम, शांताबाई दामोदर येटे, उज्ज्वला विलास मेश्राम, योगीता गुलाब कनाके, मनिषा अनिल कंगाले, सुनिता दीपक टेकाम, सिमा मडकाम, सविता कोडापे व कविता कोडापे यांच्यासह स्थानिक महिला व ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत. आता मारेगाव पोलीस यावर काय कारवाई करतात, याकडे लक्ष लागले आहे.

## महत्वाचे

### सात फुटी धामणला जीवनदान; एम. एच. 29 च्या टीमची तत्परता



**आर्णी :** शहरासह तालुक्यात सध्या साप निघण्याचे प्रमाण वाढले असून, वातावरणातील बदलामुळे वन्यजीव व सरपटणारे प्राणी नैसर्गिक अधिवासातून मानवी वस्तीकडे येत असल्याचे दिसून येत आहे. अशाच प्रकारे शनिवारी सेवादास नगर येथे नव्याने बांधण्यात आलेल्या गोदामात तब्बल सात फुटी धामण साप आढळून आला. 'MH29 Helping Hands'च्या पथकाने तत्परता दाखवत या सापाला सुरक्षितपणे पकडून जीवनदान दिले. सेवादास नगर येथील शाहरुख फानन यांच्या गोदामात धामण साप आढळल्यानंतर तो जवळील झोपडीत दडून बसला. याची माहिती पत्रकार सद्दाम शेख यांना मिळताच त्यांनी वेळ न दवडता सर्पमित्र अनिकेत पंडित यांच्याशी संपर्क साधला. माहिती मिळताच अनिकेत पंडित यांनी सहकारी सुजल ठवकर यांच्यासह काही मिनिटांतच घटनास्थळी धाव घेतली. सर्पमित्रांनी कौशल्याने सात फुटी धामण सापाला कोणतीही इजा न करता सुरक्षितपणे पकडले. यावेळी उपस्थित नागरिकांना सापांबाबत माहिती देण्यात आली. साप आढळल्यास घाबरून न जाता स्वतः पकडण्याचा प्रयत्न न करता 'MH29 Helping Hands'च्या टीमशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले. पकडलेल्या धामण सापाला त्याच्या नैसर्गिक अधिवासात सुरक्षितपणे सोडण्यात आले. विषारी असो वा बिनविषारी, कोणत्याही सापाला स्वतः पकडण्याचा प्रयत्न करू नये, असे आवाहन सर्पमित्र अनिकेत पंडित यांनी केले.

### शेतीसाठी दिवसा बारा तास अखंडित वीज पुरवठा द्या !

**बाभूळगाव :** महावितरणकडून ८ तास लाईन दिली जात असल्याचे सांगितले जात असले, तरी तालुक्यातील करळगाव फिडरवर ५ वायरमन कार्यरत असून सुद्धा दिवसभरात १० वेळा लाईन बंद केली जाते. त्यामुळे ८ तासांपैकी ४ तास लाईन बंद राहण्यातच जातात. उरलेल्या केवळ ४ तासांत पिकांचे ओलित होत नाही आणि पिके जळून जात आहेत. त्यामुळे शेतीसाठी दिवसा बारा तास अखंडित वीज पुरवठा द्यावा, या मागणीचे निवेदन राणी अमरावती येथील शेतक-यांनी महावितरणचे अधीक्षक अभियंता, उपविभागीय अभियंता यांना दि. २० ऑगस्ट रोजी दिले. १ ऑगस्टपासून आमच्या शेतशिवारात पाऊस नसल्यामुळे शेतातील पिके पूर्णपणे सुकत आहेत. पिकांना वाचवण्यासाठी पाण्याची अत्यंत गरज आहे. राणी अमरावती शेतशिवारात महावितरणच्या अभियंत्यांनी कागदोपत्री पूर्तता करून २ डीपी मंजूर करून घेतल्या होत्या. त्यापैकी १ डीपी बसवली आहे, परंतु तिचे कनेक्शन अद्याप जोडलेले नाही, तर दुसऱ्या डीपीचा काहीही पत्ता नाही. तसेच राणी अमरावती फिडर वेगळे करण्यासाठी कागदोपत्री पूर्तता करून मंजुरी आणली होती, तरीही ते फिडर अद्याप वेगळे केलेले नाही. त्यामुळे शेतीचे मोठे नुकसान होत आहे. रात्रीच्या वेळी अंधारामुळे शेतात जाणे शक्य होत नाही, त्यामुळे रात्रीच्या वेळी शेत शिवारात सिंगल फेज विद्युत पुरवठा करण्यात यावा.अशी मागणी श्रीकृष्ण परोपटे, राफिकोद्दिन काझी, सतीश मेंढे, आरिफ खान, विजय हदेकर, मो.मुस्ताक मो. शरीफ आदि शेतकऱ्यांनी केली आहे. मागण्या मान्य न झाल्यास महावितरण बाभूळगाव कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

### दिव्यांग वारीतील वारक-यांचा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर समितीतर्फे गौरव



**यवतमाळ :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीच्या तिसऱ्या पर्वातील बारावे पूजन रविवारी (ता. २३) सायंकाळी ६.३० वाजता महात्मा फुले चौक, आझाद मैदानासमोर उत्साहात पार पडले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारक समिती, यवतमाळच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात यवतमाळ ते पंढरपूर पायी दिव्यांग वारीत सहभागी झालेल्या वारकऱ्यांचा गौरव करण्यात आला.

यावेळी प्रज्वल तुमसरे, इर्शाद लतिक, यश गायकवाड, अतुल कावळे, आकाश कांबळे, मोहन भगत, प्रशांत मडावी, ज्ञानेश्वर धबडगे, योगेश शेळके, सोनम ठाकरे, सुहानी वावरे, मालू जाधव, नंदिनी चहांदे, निकिता लोणकर, आचल चिचगाम, रीमा तोडकर, अश्विनी खडतकर, नैना पत्रकार, विधी डोंगरवार, गणेश नेवारे, मोहन कुकडे, सागर हुसणापुरे, चंद्रकला निस्ताने, राजेंद्र गावंडे यांच्यासह सेवा समितीचे प्रमुख सुरेश राठी यांचा गौरव करण्यात आला.

### सैनिकांसाठी दोन हजार राख्यांची भेट

**हिंगोली :** देशाच्या सीमेवर अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या भारतीय सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी अन्नपूर्णा स्कूल ऑफ स्कॉलर्सच्या वतीने दोन हजार राख्या पाठविण्यात आल्या. रक्षाबंधनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी देशरक्षणासाठी कार्यरत जवानांप्रती आपुलकी, आदर आणि कृतज्ञता व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी प्रेमाने तयार केलेल्या या राख्यांमधून देशाचे रक्षण करणाऱ्या सैनिकांना बहिणीच्या प्रेमाची आणि शुभेच्छांची साथ देण्याचा भाव व्यक्त करण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, राष्ट्रप्रेम, सामाजिक बांधिलकी तसेच सैनिकांविषयी आदराची भावना रुजविण्यास मदत झाली. या वेळी संस्थेचे अध्यक्ष किरण सोनटक्के, सचिव शितल सोनटक्के, समन्वयक भुसारे, प्राचार्य सिंग रेड्डी, प्राचार्य सहदेवदास, सांस्कृतिक विभागप्रमुख सविता सोनटक्के, चंदा तसेच शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनी विद्यार्थ्यांच्या उपक्रमाचे कौतुक करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

# सावळी सदोबा परिसरात अळीच्या प्रादुर्भावाने शेतकरी चिंतेत

## कृषी सहाय्यकांच्या मार्गदर्शनाअभावी शेतकऱ्यांची अडचण

सावळी स.



आर्णी तालुक्यातील सावळी सदोबा परिसरात यंदा पावसाने अधूनमधून दडी मारल्याने खरीप पिकांवर प्रतिकूल परिणाम होत आहे. त्यातच कापूस, सोयाबीन तसेच अन्य पिकांवर विविध प्रकारच्या अळ्या व किडींचा प्रादुर्भाव वाढू लागल्याने शेतकरी चिंतेत सापडले आहेत. पावसातील खंडामुळे पिकांची वाढ खुंटत असतानाच किडींच्या वाढत्या प्रादुर्भावाने शेतकऱ्यांच्या अडचणीत भर पडली आहे.

परिसरातील अनेक शेतांमध्ये अळीमुळे पिकांच्या पानांना छिद्रे पडणे, कोवळ्या भागांचे नुकसान होणे यासारखी लक्षणे दिसून येत आहेत. वेळीच कीड नियंत्रणाच्या उपाययोजना न केल्यास उत्पादनात घट होण्याची शक्यता शेतकरी व्यक्त करीत आहेत. त्यामुळे अळीची योग्य ओळख करून तिच्या नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना आणि औषधांची शिफारस करण्यासाठी कृषी विभागाच्या मार्गदर्शनाची गरज आहे.

मात्र, सावळी सदोबा परिसरातील अनेक शेतकऱ्यांना आपल्या भागातील कृषी सहाय्यक कोण आहे, याचीच माहिती नसल्याची स्थिती आहे. मार्गदर्शन करणे तर दूरच; प्रत्यक्ष शेतात जाऊन पिकांची पाहणी करण्यासाठी कृषी सहाय्यकांना वेळ मिळत नसल्याची तक्रार शेतकऱ्यांकडून होत आहे. कृषी विभागातील संबंधित कर्मचारी तालुक्याच्या ठिकाणाहूनच कारभार पाहत असल्याने शेतकऱ्यांना वेळेवर मार्गदर्शन मिळत नसल्याचा आरोपही करण्यात येत आहे.

कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांना मार्गदर्शन तसेच कीड सर्वेक्षणाची तरतूद असतानाही त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याची खंत शेतकरी व्यक्त करीत आहेत. पिकांचे नुकसान टाळण्यासाठी कृषी विभागाने तातडीने विशेष कीड सर्वेक्षण मोहीम राबवून प्रभावित शेतांची प्रत्यक्ष पाहणी करावी. तसेच गावागावांत शेतकरी मार्गदर्शन शिबिरे घेऊन अळी नियंत्रणाबाबत योग्य सल्ला द्यावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# गावठी दारूभट्ट्यांवर आर्णी पोलिसांचा 'सर्जिकल स्ट्राईक'; १ लाख ८० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त

आर्णी



अवैध गावठी हातभट्टी दारू निर्मिती व विक्रीविरोधात आर्णी पोलिसांनी धडक कारवाई करत ब्राह्मणवाडा तांडा आणि मसोला परिसरातील चार ठिकाणी छापे टाकले. दिनांक २२ रोजी करण्यात आलेल्या या कारवाईत मोहामाचाचा सडवा, गावठी हातभट्टी दारू आणि दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणारे साहित्य असा एकूण १ लाख ८० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलिसांना ब्राह्मणवाडा व मसोला शेतशिवारात सकाळच्या सुमारास अवैधरीत्या गावठी हातभट्टी दारू तयार करून विक्री केली जात असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी कारवाईचे नियोजन करून संबंधित ठिकाणी छापे टाकले. ब्राह्मणवाडा तांडा येथे सौ. ज्योत्स्ना तेजस राठोड वय २८ यांच्या राहत्या घरातील खोलीत सुरू असलेल्या हातभट्टीवर कारवाई करण्यात आली. यावेळी विविध ड्रममध्ये साठवलेला सुमारे ६८० लिटर मोहामाचाचा सडवा, गावठी दारू तसेच दारू गाळण्याचे साहित्य असा ६२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. मसोला शेतशिवारात किसन शिवराम गायकवाड वय ५५ यांच्या शेतात पोलिसांनी छापा टाकला. येथे प्लास्टिक टाक्या व लोखंडी पिपांमध्ये साठवलेला मोहामाचाचा सडवा, गावठी दारू आणि इतर साहित्य असा ७६ हजार रुपयांचा मुद्देमाल आढळून आला. त्यानंतर मसोला गावाच्या दक्षिणेकडील जंगलालगतच्या नाल्यात वसंता पुनाजी चव्हाण वय ५८ यांच्या ताब्यातील ठिकाणी कारवाई करण्यात आली. येथे सडवा, गावठी दारू व दारू निर्मितीचे साहित्य असा ३४ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच विजय बाबाराव कोयरे वय ५० यांच्या घरातून सुमारे ८० लिटर मोहामाचाचा सडवा, अंदाजे ८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्त केलेल्या गावठी दारू व मोहामाचाचा सडवा यांचे नमुने घेण्यात आले असून उर्वरित नाशवंत मुद्देमाल पंचांसमक्ष जागीच नष्ट करण्यात आला. चारही आरोपींविरुद्ध दारूबंदी कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. आर्णी पोलिसांच्या या कारवाईमुळे अवैध गावठी दारू निर्मिती करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

# सरुळ येथे दोनशे रुग्णांची नेत्र तपासणी

*यवतमाळ सत्ता, प्रतिनिधी



बाभूळगाव तालुक्यातील सरूळ येथील जि. प. प्राथमिक शाळेत झालेल्या मोतीबिंदू निर्मूलन कार्यक्रमांतर्गत दोनशे रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली. 'मानव सेवा हीच माधव सेवा' हे ब्रीद लक्षात घेऊन सत्य साईबाबांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त श्री. सत्य साई सेवा संघटना व सत्यसाई सेवा समिती परसोडी, पद्मश्री विकास महात्मे नेत्र पिढी व नेत्र रुग्णालय नागपूर आणि राष्ट्रीय अंधत्व व दृष्टीक्षिनता नियंत्रण कार्यक्रम यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच समाजसेवक स्व. भीमसिंगबाबू सोळंके आणि स्व. नामदेवराव मस्के यांचे स्मृतिप्रित्यर्थ नि:शुल्क नेत्र तपासणी, शस्त्रक्रिया शिबिर पार पडले. अध्यक्षस्थानी आदर्श पुरस्कार प्राप्त शिक्षक सुभाषचंद्र आचलिया तर प्रमुख अतिथी उपायुक्त शामकांत मस्के यांची उपस्थिती होती. डॉ. गंगमवार, दत्तात्रय बिरे, रामकृष्ण राऊत, नीलेश पुंडलिक, तुकाराम उर्फ अण्णाजी वानखडे, अशोक ताजने, आशिषबाबू सोळंके, मुख्याध्यापक सविता साबळे, सुनील बहिरे, पोलिस पाटील रसिका मेश्राम, डॉ. डाखरे, प्रफुल्ल खेडकर आदी मान्यवर उपस्थित होते. या शिबिरात दोनशे रुग्णांची तपासणी करून औषधोपचार करण्यात आले. २७ नेत्र रुग्णांची डॉ. महात्मे नेत्र रुग्णालय नागपूर येथे यशस्वी मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली. गरजू ४२ नेत्र रुग्णांना चष्मे वितरित करण्यात आले. या मोफत नेत्र शिबिराचे संचलन आशिषबाबू सोळंके यांनी केले. शिबिरात महात्मे रुग्णालयाचे नेत्रतज्ज्ञ डॉ. प्रतीक चंदेल, डॉ. अथर्व भोंदले, डॉ. जानवी वाणी, डॉ. आयुष गायकवाड, डॉ. संकेत शंभरकर, डॉ. महादेव बावणे आदींनी सेवा दिली. शिबिराला राजेंद्र राऊत, दिलीप मस्के, मारुती इडपाते, नारायणराव गुल्हाने, गोपाल सरदार, प्रवीण भुजबळ, आनंद सोळंके, राहुल वाघ, श्रीकांत चिकटे, प्रदीप गांडोळे, राजेंद्र लांडगे, वंदना गुल्हाने, वनिता ताजणे, सविता भाकरे, शालू थोटे आदींनी पुढाकार घेतला.

### राखीव निधी वितरीत करण्याची मागणी

झरी जामनी : गावातील युनिक कार्डधारक दिव्यांगाना ग्रामपंचायतीच्या स्वउत्पन्नातून प्राप्त झालेल्या निधीतील पाच टक्के निधी हा त्यांच्या कल्याणकारी हितार्थ वितरीत करण्याचे शासन निर्देश आहेत. हा राखीव निधी दिव्यांगाना वितरीत करावा, अशी मागणी संघटनेच्या पदाधिकार्!यांनी बच्चू कडू यांचेकडे केली आहे. इंगोले यांनी माजी राज्यमंत्री तथा विधान परिषदेचे सदस्य बच्चूभाऊ कडू यांची भेट घेऊन ही समस्या त्यांच्या दरबारात मांडली आहे. तालुक्यातील केवळ सात ते आठ ग्रामपंचायतीने या निधीचे वाटप केले.

# अवैध धंद्यांवर पोलिसांचा बुलडोझर

## तीन आठवड्यांत १,२३३ गुन्हे, ११ कोटींचा मुद्देमाल जप्त!..

*यवतमाळ सत्ता, प्रतिनिधी




**हिंगोली :** नांदेड परिक्षेत्रात सुरू असलेल्या अवैध व्यवसाय निर्मूलन मोहीम-२ अंतर्गत पोलिसांनी अवैध धंद्यांविरोधात मोठी आणि धडाकेबाज कारवाई करत गुन्हेगारी जगतात चांगलीच खळबळ उडवून दिली आहे. पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या मार्गदर्शनाखाली १ ते २१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत करण्यात आलेल्या विशेष मोहिमेत तब्बल १,२३३ गुन्हे दाखल करण्यात आले असून १,९६२ आरोपींविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे.

या कारवाईदरम्यान ११ कोटी २४ लाख ८९ हजार ७२८ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अवैध दारू, गुटखा, मटका-जुगार, अमली पदार्थ तसेच घातक शस्त्रांच्या विरोधात राबविण्यात आलेल्या या मोहिमेत नांदेड, परभणी, हिंगोली आणि लातूर जिल्ह्यांतील पोलिस यंत्रणांनी समन्वयाने मोठी मोहीम उभारली. यामध्ये महाराष्ट्र दारूबंदी कायद्यांतर्गत ७४०, महाराष्ट्र जुगार कायद्यांतर्गत २७०, भारतीय न्याय संहितेच्या कलम १२३ अंतर्गत २९, तर शस्त्र अधिनियमांतर्गत ४० गुन्हे नोंदविण्यात आले. विशेष म्हणजे, विविध प्रकारच्या अवैध धंद्यांवर करण्यात आलेल्या कारवाईत ८ कोटी ८ लाख रुपयांहून अधिक किंमतीचा मुद्देमाल इतर गंभीर प्रकरणांतून जप्त करण्यात आला. तर गुटखा, जुगार, दारू आणि शस्त्र प्रकरणांतूनही लाखो रुपयांचा माल जप्त करून गुन्हेगारीला आर्थिक फटका देण्यात आला. हिंगोली जिल्ह्यातदेखील या मोहिमेचा मोठा प्रभाव दिसून आला. जिल्ह्यात २७९ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली असून अनेक आरोपींना अटक करण्यात आली आहे. अवैध व्यवसायांविरोधातील ही मोहीम पुढील आठवड्यांमध्ये आणखी व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार असल्याचे पोलिस प्रशासनाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, नागरिकांनी आपल्या परिसरातील अवैध धंद्यांची माहिती पोलिसांपर्यंत पोहोचवावी, यासाठी पोलिस प्रशासनाने 'खबर' हेल्पलाईन सुरू केली आहे. ९१ ५० १०० १०० या क्रमांकावर फोन किंवा व्हॉट्सॲपद्वारे माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अवैध धंद्यांवर आक्रमक कारवाई करून कायद्याचे राज्य अधिक बळकट करण्याच्या दिशेने नांदेड परिक्षेत्र पोलिसांनी उचललेले हे पाऊल नागरिकांमध्ये समाधान व्यक्त करणारे ठरत असून, गुन्हेगारीविरोधातील लढा अधिक तीव्र होण्याचे संकेत मिळत आहेत.

# 'कापूस पीक' प्रशिक्षणाला प्रतिसाद

*यवतमाळ सत्ता, प्रतिनिधी

**मारेगाव :** आदिवासी आणि अतीदुर्गम भागातील शेतकर्!यापर्यंत आधुनिक शेती तंत्रज्ञान आणि शासकीय योजना पोहोचविण्याच्या उद्देशाने कृषी विभागातर्फे तालुक्यातील रायपूर येथे 'कापूस पीक व्यवस्थापन' या विषयावर विशेष शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला.

अवघ्या शंभरच्या आसपास लोकसंख्या असलेल्या या अत्यंत दुर्गम गावात प्रथमच शासकीय विभागाचा असा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याने ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. तालुका कृषी अधिकारी दीपाली खवले यांनी शेतकर्!यांना मार्गदर्शन केले. यामध्ये मुख्यत्वे कापूस पिकाचे सुधारित व्यवस्थापन, खतांचा संतुलित वापर, कीड व रोग नियंत्रण आणि पिकांची उत्पादकता वाढवण्यासाठी आवश्यक असलेल्या विविध उपाययोजनांवर सविस्तर चर्च करण्यात आली. सहाय्यक कृषी अधिकारी तुषार मेश्राम आणि विनायक जुमनाके यांच्या माध्यमातून विविध शासकीय योजनांचा लाभ आणि वेळेवर मार्गदर्शन मिळत असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. कार्यक्रमात शेतकर्!यांनी विचारलेल्या समस्या व प्रश्नांचे निराकरण अधिकारी, कर्मचारी यांचेकडून करण्यात आले. या कार्यक्रमाला मंडळ कृषी अधिकारी किशोर डोंगरकर, उपकृषी अधिकारी एस. व्ही. कोषेटवार, व्ही. बी. पवार, सचिन आत्राम, गणेश कोल्हे, एन. पी. पवार, विनायक जुमनाके, व्ही. एस. पारधी आणि शामल राऊत उपस्थित होते. तसेच माजी सरपंच अजाब तोडासे, पंजाब तोडासे, योगेश वड्डे, वैशाली मेश्राम यांच्यासह गावातील शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सामाजिक वनीकरण कार्यालयाला नेहमीच कुलूप; कोट्यवधींच्या वृक्षलागवडीवर भ्रष्टाचाराचे सावट?

## रोपे लावली, पण पाणीच नाही; दारव्हा तालुक्यातील वृक्षलागवड योजनेचा बोजवारा, नागरिकांकडून चौकशीची मागणी

***यवतमाळ सत्ता, प्रतिनिधी**
**सदानंद खिल्लारे**

**दारव्हा** : दारव्हा तालुक्यात पर्यावरण संवर्धनाच्या नावाखाली सामाजिक वनीकरण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या वृक्षलागवड योजनेवरच आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

शासनाचा लाखो-कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करून रस्त्यांच्या दुतर्फा रोपे लावण्यात आली; मात्र लागवडीनंतर त्यांची देखभाल आणि पाणीपुरवठा झाला नसल्याने अनेक रोपे उन्हाच्या तडाख्यात सुकून मरगळलेल्या अवस्थेत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

दारव्हा–आर्णी, दारव्हा–नेर, दारव्हा–करंजा आणि दारव्हा–यवतमाळ या प्रमुख मार्गांवर मोठ्या प्रमाणात रोपांची लागवड करण्यात आली आहे. अनेक ठिकाणी थातूरमातूर खड्डे करून रोपे लावण्यात आले,मात्र त्यानंतर नियमित पाणी व संगोपनाची व्यवस्था करण्यात आली नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे शासनाच्या पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशालाच हरताळ फासला जात असल्याची संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

विशेष म्हणजे सामाजिक वनीकरण विभागाचे दारव्हा येथील कार्यालय सतत कुलूपबंद असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. कार्यालय बंद असल्याने अधिकारी-कर्मचाऱ्यांची उपस्थिती, योजनांची अंमलबजावणी, कंत्राटदाराची जबाबदारी आणि खर्च झालेल्या निधीची माहिती मिळणार कशी, असा सवाल उपस्थित होत आहे.

रोपलागवडीसाठी नेमलेल्या कंत्राटदाराने प्रत्यक्षात किती रोपे लावली? त्यासाठी किती निधी मंजूर व खर्च झाला? रोपांच्या संगोपनासाठी किती तरतूद करण्यात आली? तसेच प्रत्यक्ष कामाची पाहणी संबंधित अधिकाऱ्यांनी केली का, याची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

दरम्यान, भ्रष्टाचाराचे आरोप अद्याप सिद्ध झालेले नसून संबंधित विभागाची अधिकृत बाजू समोर येणे आवश्यक आहे. मात्र रोपे सुकत असताना शासनाचा पैसा पाण्यात जात आहे का, असा सवाल आता दारव्हा तालुक्यात जोर धरू लागला आहे. प्रशासनाने तातडीने पाहणी करून दोषींवर कारवाई करावी आणि संपूर्ण खर्चाचा हिशेब सार्वजनिक करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.



## वाढत्या अपघातांवर उपाययोजनांसाठी सर्वपक्षीय चर्चा

***यवतमाळ सत्ता, प्रतिनिधी**

**घाटंजी:** शहर व परिसरात दिवसेंदिवस अपघातांचे प्रमाण वाढत असून, किरकोळ दुखापतींसह गंभीर अपघात आणि मृत्यूच्या घटनांमध्येही वाढ होत आहे.

या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत असून, अपघातांना आळा घालण्यासाठी प्रशासन आणि नागरिकांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली आहे. 'सामाजिक एकता ग्रुप'च्या पुढाकाराने ही बैठक शनिवार, २२ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता पोलीस ठाणे, घाटंजी येथे होणार आहे.

नुकतेच जि. प. शाळेतील आदर्श शिक्षक स्व. किशोर मडावी हे रस्ता ओलांडताना झालेल्या गंभीर अपघातात जखमी झाले होते. उपचारादरम्यान त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे शहरातील अपघातांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. केवळ अपघातानंतर हळहळ व्यक्त करण्याऐवजी त्यामागील कारणांचा शोध घेऊन प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची गरज व्यक्त होत आहे.

बैठकीत शहरातील वाढते अपघात, वाहतूक व्यवस्थेतील त्रुटी, रस्त्यांची स्थिती, वाहनांच्या वेगावर नियंत्रण, धोकादायक ठिकाणे तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजनांवर चर्चा करण्यात येणार आहे. प्रशासनासमोर अपघात प्रतिबंधासाठी ठोस उपाययोजनांचा आराखडा मांडण्याचा प्रयत्न यावेळी केला जाणार आहे.

## विज्ञान मेळाव्यात प्राची शिंदे प्रथम

**महागाव** : महागाव येथे झालेल्या तालुकास्तरीय विज्ञान मेळाव्यात मातोश्री विद्यालयाची विद्यार्थिनी प्राची शिंदे हिने 'भारतीय ऊर्जा क्षेत्र–२०४७ : संधी आणि आव्हाने' विषयावर उत्कृष्ट सादरीकरण करत प्रथम क्रमांक पटकावला. तिच्या यशाबद्दल संस्थापक दिगंबर जगताप, प्राचार्य, शिक्षक व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

# समाजाला दिशा, विवेक आणि जीवनमूल्ये देण्याचे कार्य विद्वान तथा गुरू करतात : डॉ. वैशाली जोशी

***यवतमाळ सत्ता, प्रतिनिधी**




**यवतमाळ** : विद्वान म्हणजे केवल पुस्तकं वाचलेला, अनेक पदव्या मिळविलेला व्यक्ती नव्हे तर विद्वत्तेसह नम्रता, विवेक,, सत्यनिष्ठा, सदाचारी तथा अहंकार विरहित असतो तोच खरा विद्वान.'स्वदेशे पूज्यते राजा, विद्वान सर्वत्र पूज्यते' राजा हा भौतिक धन धारक असतो तर विद्वान अलौकि विद्याधन धारक असतो. राजा हे प्रतीक संपत्तीचे, सत्तेचे, अधिकार, सामर्थ्याचे तर विद्वानाजवळ अक्षय, चिरंतन विद्याधनाचे भांडार असते. म्हणून विद्वान हे वंदनीय असतात.. पुजनीय असतात. ज्या समाजात विद्वानांचा सन्मान त्याच समाजात संस्कृती जिवंत असते. कारण 'समाजाला दिशा, विवेक.. आणि जीवनमूल्ये देण्याचे कार्य विद्वान तथा गुरू करतात' असे प्रतिपादन सौ. वैशाली महेश जोशी यांनी केले. श्री. बालाजी देवस्थान मंडळाद्वारा आयोजित श्रावणमास प्रवचन मालिकेत 'भर्तृहरिप्रणीत नीतिशतक' या विषयानुषंगाने विद्वत्पद्धती या प्रकरणावर तृतिय प्रवचन पुष्प गुंफताना त्यांनी विद्वानमहती विषद केली. प्रवचनकाराचे स्वागत सौ. चित्राताई दाणी यांनी केले.महाकवी, वेदांतपंडीत सम्राट तथा वैराग्यधारक भर्तृहरि यांनी १० श्लोकांमधून विद्वानाचे लक्षण, कर्तव्य आणि कार्यपद्धती विषद केली. शास्त्रशुद्ध वाणी, शुद्ध व पवित्र विचार,, कल्याणप्रद वाणी, सारगर्भ सुभाषित, आशयप्रधान विवेचन ही लक्षणे विद्वानाचे ठायी असावी. विद्वानाच्या ठायी परमतत्त्वाचे ज्ञान असावे. कारण हे ज्ञान प्राप्त झाल्यावर क्रोध, अहंकार, द्वेष नष्ट होतात. भर्तृहरिचे नीतिशकत हे आजच्या युगात सुद्धा दीपस्तंभाचे कार्य करतात. ते म्हणतात विद्वतेसोबतच चांगले गुण नसतील तर त्याची रावणासारखी गत होणारचं. विद्वतेला व्यवहारकुशलतेची जोड नसेल तर धृतराष्ट्रासारखी अवस्था होणार ! त्यासाठी सावध असावे, विद्या डोक्यात गेली तर 'वाद' होतो. हृदयात गेली तर 'संवाद' होतो आणि जीवनात उतरली तर समाजाचा उद्धार होतो असे विधान करून त्यांनी आपल्या प्रवचनाची सांगता केली. सुत्रसंचालन, परिचय व आभार रेणुका राखे यांनी केले

## नेर तालुक्यातील फोटोग्राफर बांधवांचा सामाजिक उपक्रम

***यवतमाळ सत्ता, प्रतिनिधी**

**नेर** : जागतिक छायाचित्र दिनानिमित्त नेर तालुक्यातील समस्त फोटोग्राफर बांधवांनी एकत्रित येत विविध सामाजिक उपक्रमांनी हा दिवस उत्साहात साजरा केला. छायाचित्रणाच्या क्षेत्राशी जोडलेल्या बांधवांनी सामाजिक बांधिलकी जपत कार्यक्रमाला आगळेवेगळे स्वरूप दिले.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी कॅमेरा पूजनाने करण्यात आली. त्यानंतर वृद्धाश्रम येथे अन्नदान करण्यात आले.

यावेळी फोटोग्राफर बांधवांनी वृद्धांना भोजन देत सामाजिक संवेदनशीलतेचा आदर्श निर्माण केला. त्यानंतर सर्वांनी सामूहिक भोजनाचा आनंद घेतला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी वृक्षारोपण देखील करण्यात आले.

या कार्यक्रमाला नेर नगरपरिषदेच्या आदरणीय नगराध्यक्षा सौ. सुनीता पवन जायसवाल तसेच उपनगराध्यक्षा सौ. शिवानी निशांत गुगलिया यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाला बालाजी फसाटे, गौतम खंडारे, महेंद्र गजभिये, शफीक मिर्झा, गौरव मैंद, प्रसाद मुळे, प्रज्वल उघडे, प्रज्वल नगराळे, शुभम नंदनवार, आकाश नाकतोडे, अक्षय सूरजसे, वासिम पठाण, चारुदत्त पारधी, अविनाश चांदोरे, ओम शिंदे, अजय विलायतकर, तेजस गोल्हर, चेतन गावंडे, महेश बरडे, तुषार ऊके, अमोल घोडे यांच्यासह नेर तालुक्यातील अनेक फोटोग्राफर बांधव उपस्थित होते.

कॅमेऱ्यातून आठवणी जपताना समाजाप्रती असलेली जबाबदारीही जपली पाहिजे, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

## महत्वाचे

### धाग्यातून साकारले शंभू महादेव



**ढाणकी :** श्रावण महिना आणि भक्तीचा अतूट संबंध आहे. प्रत्येकजण आपल्या परीने भगवान शंकराप्रती भक्ती व्यक्त करत असतो. याच भक्तीला कलात्मक रूप देत शकुंतला आजेगावकर यांनी साध्या धाग्यापासून शंभू महादेवाची पिंड साकारली आहे. त्यांच्या या अनोख्या हस्तकलेने परिसरातील नागरिकांचे लक्ष वेधून घेतले आहे.

टाकाऊ वस्तू आणि साध्या पांढऱ्या धाग्याचा कल्पक वापर करून त्यांनी ही आकर्षक कलाकृती तयार केली. पारंपरिक आकार देण्यात आलेल्या या पिंडेला पिवळ्या धाग्याने चंदनासारखी नक्षी करण्यात आली असून, भस्माच्या स्वरूपातील रचना केल्यामुळे कलाकृतीला अधिक उठाव आला आहे. अत्यंत बारकाईने केलेल्या विणकामातून त्यांच्या कलेतील कौशल्य, संयम आणि एकाग्रता दिसून येते.

ही कला जोपासण्यासाठी प्रचंड एकाग्रता आवश्यक असते. धाग्यांपैकी एखादा धागा जरी चुकला, तरी संपूर्ण शिलाई उसवावी लागते. त्यामुळे चित्त स्थिर ठेवून प्रत्येक धाग्याचा बारकाईने विचार करावा लागतो. वयाच्या सतराव्या वर्षापासून त्यांनी या कलेची साधना सुरू केली. सत्तरी ओलांडल्यानंतरही शरीराची साथ कमी होत असतानाही त्यांनी आपली कला जपली आहे. आपल्या कल्पनेतील महादेवाची पिंड धाग्यांच्या माध्यमातून प्रत्यक्षात साकारल्याचे समाधान त्यांना आहे. आतापर्यंत त्यांनी अनेकांना ही कला मोफत शिकवण्याचा प्रयत्न केला असून, आजही इच्छुक व्यक्ती त्यांच्याकडे ही कला शिकण्यासाठी येतात. विविध धाग्यांपासून तोरण, रंगीबेरंगी धाग्यांचे आसन, लहान मुलांसाठी स्वेटर तसेच विविध सुबक कलाकृती त्या नियमितपणे साकारतात. A"या कलेमध्ये परिपूर्ण होण्यासाठी आजही शिकण्याची वृत्ती कायम आहे," असे शकुंतला आजेगावकर यांनी सांगितले. साध्या धाग्याला कल्पकता, भक्ती आणि मेहनतीची जोड दिल्यास सुंदर कलाकृती साकारता येते, याचा प्रत्यय त्यांच्या या अनोख्या कलाकृतीतून येतो.

### राळेगावच्या क्रीडा संकुलाला विकासाची नवी झेप



**राळेगाव :** राळेगाव शहरातील युवकांसाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या क्रीडा संकुलाच्या विकासाला आता आणखी चालना मिळण्याची शक्यता आहे. आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांच्या प्रयत्नातून सुमारे ३.५ कोटी रुपयांची विविध विकासकामे सुरू असतानाच, क्रीडा संकुलाच्या विस्तारीकरण व आधुनिकीकरणासाठी अतिरिक्त १० कोटी रुपयांची मागणी करण्यात आली आहे.

भाजपचे यवतमाळ जिल्हाध्यक्ष ॲड. प्रफुल्लसिंह चौहान यांनी आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांच्यासोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन राळेगाव क्रीडा संकुलाच्या विकासाचा प्रस्ताव मांडला. यावेळी परिसरातील युवक व खेळाडूंसाठी आवश्यक सुविधांची माहिती देऊन अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. प्रस्तावित निधीतून अद्ययावत व्यायामशाळा, इनडोअर स्टेडियम, विविध प्रकारची क्रीडांगणे आणि नियमित सरावासाठी आवश्यक सुविधा उभारण्याचा प्रस्ताव आहे. यासोबतच पोलीस, सैन्य तसेच विविध शासकीय भरतीची तयारी करणाऱ्या युवकांसाठी सुसज्ज वसतिगृह उभारण्याची मागणी करण्यात आली आहे. राळेगाव व परिसरातील अनेक युवक भरती तसेच स्पर्धा परीक्षांची तयारी करीत आहेत. स्थानिक पातळीवर दर्जेदार प्रशिक्षणाच्या सुविधा उपलब्ध झाल्यास त्यांना बाहेरच्या शहरांमध्ये जाऊन महागड्या सुविधा घेण्याची गरज कमी होणार आहे. त्यामुळे क्रीडा संकुलाचा उपयोग केवळ खेळापुरता मर्यादित न राहता युवकांच्या प्रशिक्षणासाठीही होणार आहे. राळेगाव क्रीडा संकुलासाठी डॉ. अशोक उईके यांच्या प्रयत्नातून सुमारे ३.५ कोटी रुपयांची कामे सुरू झाली आहेत. आता अतिरिक्त १० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाल्यास या संकुलाला अधिक सुसज्ज स्वरूप मिळण्याची अपेक्षा आहे.

## जलसंधारण सप्ताहनिमित्त औषधी वनस्पतींचे रोपण



***यवतमाळ सत्ता, प्रतिनिधी**

**पुसद** : महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा जलसंधारणाचे प्रणेते सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त पुसद येथील श्री. गजानन महाराज संस्थान संचालित आयुर्वेद महाविद्यालयात गुरुवारी (ता २०) वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त शासनाच्या वतीने राज्यभर मृद व जलसंधारण सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानुषंगाने आयुर्वेद महाविद्यालयाच्या परिसरात विविध औषधी वनस्पतींची लागवड करण्यात आली. महाविद्यालयाच्या अध्यक्ष डॉ. आराधना नाईक, सचिव अशोक चव्हाण तसेच संचालक पूजा नाईक यांच्याहस्ते कर्पूर, अडुळसा, शमी, रक्तचंदन, बकुळ, रुद्राक्ष, अशोक, पारिजात, रोजमेरी, गुग्गुळ, कांचनार, जांभूळ, तेजपत्र, सप्तपर्णी, करंज आदी विविध औषधी वनस्पतींचे रोपण करण्यात आले.

# स्वातंत्र्यदिनाच्या उत्साहात एसबीआय शाखेत वृक्षारोपण व कर्मचाऱ्यांचा सत्कार !

***यवतमाळ सत्ता, प्रतिनिधी**



**उमरखेड** : येथील भारतीय स्टेट बँक शाखेच्या वतीने स्वातंत्र्य दिनानिमित्त, वृक्षारोपण तसेच उत्कृष्ट सेवा बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सत्कार अशा विविध उपक्रमांचे आयोजन उत्साहपूर्ण व देशभक्तीमय वातावरणात करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात शाखा व्यवस्थापक प्रदीप फटींग यांच्या हस्ते ध्वजारोहणाने झाली. त्यानंतर बँकेच्या कामकाजात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या कर्मचाऱ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव करून त्यांच्या सेवाभावाचे कौतुक करण्यात आले. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी भारतीय स्टेट बँकेच्या वतीने वृक्षारोपण उपक्रमही राबविण्यात आला. येथील गोपिकाबाई सीताराम गावंडे महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागाच्या सहकार्याने महाविद्यालयाच्या परिसरात विविध वृक्षांची लागवड करण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष राम देवसरकर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या उपक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. बी. कदम, उपप्राचार्य, प्राध्यापकवर्ग तसेच भारतीय स्टेट बँकेचे शाखा व्यवस्थापक प्रदीप फटींग व सर्व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी केवळ वृक्षलागवड न करता लावलेल्या रोपांचे नियमित संगोपन व संवर्धन करण्याचा संकल्प करण्यात आला. स्वातंत्र्यदिनाचा उत्सव सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संवर्धनाशी जोडत एसबीआय शाखेने समाजाप्रती आपली जबाबदारी अधोरेखित केली. वृक्ष हेच भविष्यातील पिढ्यांसाठी सुरक्षित पर्यावरणाचे आधारस्तंभ असून, प्रत्येकाने वृक्षारोपणासोबतच त्यांचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारावी, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. बँक कर्मचारी, महाविद्यालयीन प्राध्यापक व उपस्थित मान्यवरांच्या सहभागामुळे हा उपक्रम उत्साहात पार पडला.





# परजना-ब्राम्हणगाव निसर्गरम्य माळ टेकडीवर विसावले शिवपार्वती

***यवतमाळ सत्ता, प्रतिनिधी**

**उमरखेड** : ब्राह्मणगाव परजना सीमेवरील माळ टेकडीवर निसर्गरम्य वातावरणात स्थिरावलेली भगवान शिवपार्वती जोडी भाविकांना आकर्षित करते .श्रावण महिन्यात या निसर्गरम्य वातावरणाचा आस्वाद घेत मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येथे येतात.

या माळटेकडीवर भगवान दोन मंदीरे आहे. ब्राम्हणगाव हद्दीत असलेल्या माळटेकडीच्या पायथ्याशी असलेल्या मंदिरात शिवपार्वतीच्या दगडाच्या रेखीव मुर्ती, पायऱ्या चढून टेकडीवरही परजना हद्दीत अशीच शिव पार्वतीची आकर्षक सुडौल मुर्ती पुरातन काळापासून विराजमान आहेत. बेलमंडळ येथील शिव उपासक श्री संत भुजंगाप्पा महाराज येथे स्थिरावले त्यांचीही येथे समाधी आहे . ब्राम्हणगावचे दानशुर महापुरुष श्री तेजमल गांधी यांचीही या परिसरात समाधी आहे अशा या हिरव्याकंच शिताफळांच्या व इतर गर्द झाडीच्या निसर्गरम्य वातावरणात विराजमान झालेल्या श्रावण महिन्यात मनाला भुरळ घालणाऱ्या या निसर्ग वैभव लाभलेल्या शिवमंदीरात दर्शनासाठी भाविकांची तोबा गर्दी होते . ब्राम्हणगाव व परजना मंदीर परिसरात दोन्ही ठिकाणी बैलपोळाही भरतो. विदर्भ मराठवाड्यातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या निसर्गाच्या कुशीत विराजमान झालेल्या शिव मंदीर परिसरातील प्रसन्न आल्हाददायी वातावरणाचा आस्वाद घेण्यासाठी श्रावण महिन्यात भाविक मोठ्या संख्येने येतात.

# वाघाच्या वावराने बोर्डा परिसरात शेतकरी धास्तावले; गाईची शिकार

***यवतमाळ सत्ता, प्रतिनिधी**



**वणी** : बोर्डा परिसरात वाघाचा वावर असल्याच्या चर्चेला पशुधनावर होणाऱ्या सलग हल्ल्यांमुळे बळ मिळाले आहे. सोमवारी सकाळी बोर्डा शिवारात वाघाने एका गाईवर हल्ला करून तिची शिकार केल्याची घटना समोर आली. विशेष म्हणजे, अवघ्या आठ दिवसांच्या कालावधीत पशुधनावर झालेला हा दुसरा हल्ला असल्याने परिसरातील शेतकरी आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

यापूर्वीही बोर्डा परिसरात वाघाने गायीची शिकार केल्याची घटना निदर्शनास आली होती. त्यानंतर पुन्हा एका गाईचा बळी गेल्याने पशुधनाच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. सलग घटनांमुळे बोर्डा, घोसा आणि रासा परिसरातील नागरिकांमध्ये चिंता वाढली असून, वाघाच्या भीतीने शेतकरी व शेतमजूर शेतात जाण्यासही धजावत नसल्याचे चित्र आहे. घटनेची माहिती मिळताच वन विभागाच्या पथकाने घटनास्थळी व परिसराची पाहणी केली. वाघाच्या हालचालींचा मागोवा घेण्यासाठी जंगल परिसरात कॅमेरे लावण्यात आले असून, वन विभागाचे पथक सतर्क झाले आहे. मृत गाईवर झालेल्या हल्ल्याची पाहणी करून हा हल्ला वाघानेच केला आहे का, याबाबत वन विभागाकडून तपास करण्यात येत आहे. सध्या शेतीचा हंगाम सुरू असल्याने शेतकरी आणि शेतमजुरांना नियमितपणे शेतात जावे लागत आहे. मात्र, परिसरात वन्यप्राण्याच्या हालचाली वाढल्याने त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. पशुधनावरील हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर वन विभागाने वाघाच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवून त्याचा बंदोबस्त करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. वन विभागाने नागरिकांना जंगलालगतच्या परिसरात एकट्याने जाणे टाळण्याचे आवाहन केले आहे. विशेषतः सकाळी आणि सायंकाळच्या वेळी अधिक सतर्क राहावे. वाघ किंवा अन्य वन्यप्राणी आढळल्यास त्याचा पाठलाग अथवा गर्दी न करता तातडीने वन विभागाला माहिती द्यावी. तसेच कोणत्याही अफवेवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन वन विभागाने केले आहे.